# बृहन्मुंबईमहानगरपालिका

परिपत्रक

क्र.प्र.ले./वित्त/प्रकल्प/ २५ दिनांक: १०.१०.२०१७

विषय: महानगरपालिकेत मागविण्यात येणाऱ्या निविदांची प्रक्रिया विहित वेळेत पार पाडणेबाबत.

संदर्भ: परिपत्रक क्र.प्र.ले./एफआरडी/एक/३ दिनांक २६.०४.२००७

महानगरपालिकेत मागविण्यात येणाऱ्या निविदांची प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये ४५ दिवस इतका कालावधी निर्धारित केला आहे.

निविदेमध्ये लिफाफे 'अ', 'ब', व 'क' उघडण्याबाबत नियोजित दिनांक दिलेले असतात. तथापि, काही प्रकरणी, निविदांचे लिफाफे सदर नियोजित दिनांकास न उघडता त्यांचा नियोजित दिनांक, परस्पर निम्न स्तरावर वाढविण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी निविदा प्रक्रियेस विलंब होऊन कामे विहित वेळेत सुरू होत नाहीत. निविदेमध्ये नमूद केलेल्या नियोजित दिनांकास संबंधित लिफाफे उघडून, निविदा प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. यास्तव सर्व संबंधित Bid Approver यांनी सन २००७ च्या संदर्भित परिपत्रकामध्ये दिलेल्या कालमर्यादेचे काटेकोरपणे अनुपालन करण्याची दक्षता घ्यावी.

नियोजित दिनांकास लिफाफे उघडण्याची कार्यवाही न झाल्यास, त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित Bid Approver व खातेप्रमुख यांची राहील. तथापि, काही अपरिहार्य कारणांस्तव, निविदांचे लिफाफे 'अ', 'ब', व 'क' उघडण्याचा नियोजित दिनांक वाढवावयाचा असेल तर, त्याबाबतच्या सविस्तर कारणांसह, संबंधित निविदा ज्या अधिकाऱ्यांच्या (उप खातेप्रमुख / खातेप्रमुख / उप आयुक्त) मान्यतेने मागविलेल्या आहेत, त्यांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, ज्या निविदा अतिरिक्त आयुक्त / मान. महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेने मागविलेल्या आहेत त्यासाठी संबंधित अतिरिक्त आयुक्त यांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारे नियत दिनांक वाढविण्यास पूर्व मान्यता प्राप्त केलेली नसेल तर, निविदा प्रक्रिया पूर्व नियोजित (Existing) कालमर्यादेनुसारच पार पाडली जाणार आहे असे गृहित धरण्यात येईल.

सर्व खातेप्रमुख /सहाय्यक आयुक्त /रुग्णालय अधिष्ठाता /वैद्यकिय अधिक्षक/उपप्रमुख लेखापाल / लेखा अधिकारी यांनी उपरोक्त सूचनांची नोंद घेऊन काटेकोर अंमलबजावणी करावी.

(रा.क.आव्हाड)
प्रमुख लेखापाल (पा.पु.म. नि:)

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(डॉ.संजय मुखर्जी)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

(अजोय मेहता)
महानगरपालिका आयुक्त